दै. लोकमत दि.09.03.25

# जागतिक महिला दिनी निघाली निर्भया रॅली




जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नांदेड पोलिसांच्या पुढाकारातून शनिवारी सायंकाळी निर्भया रॅली काढण्यात आली होती. या रॅलीतून महिलांना भयमुक्त संचार आणि सुरक्षित नांदेडचा विश्वास देण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी महिला, मुली व पोलीस कर्मचारी महिलांनी सहभाग नोंदविला. दरम्यान, मुलींनी चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. छाया : सचिन मोहिते

दै. गोदातीर दि. 09.03.25

# महिला दिन : पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांची दुचाकी रॅली

नांदेड (प्रतिनिधी)- जागतिक महिला दिनानिमित्ताने जिल्हा पोलीस दलाच्यावतीने पोलीस दलातील महिला पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी दुचाकी रॅली काढून समाजातील महिलांना सुरक्षेची खात्री दिली. यावेळी रॅलीतील सहभागी महिलांनी सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास अभिवादन केले.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली शनिवार, दि. ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त व बेटी बचाओ, बेटी पढाओ या उपक्रमाला १० वर्ष पूर्ण झाले. त्या अनुषंगाने जिल्हा पोलीस दलाच्यावतीने सकाळीं ८ ते १० वाजेदरम्यान पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड ते आयटीआय चौक या मार्गावर जिल्ह्यातील महिला पोलीस अधिकारी व महिला





पोलीस अंमलदार यांची दुचाकी रॅली आयोजित करण्यात आली होती.

सदर दुचाकी रॅली पोलीस अधीक्षक कार्यालय, कलामंदिर- शिवाजीनगर- आयटीआय चौक अशी होवून सदर दुचाकी रॅलीचा आयटीआय चौक येथे महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून समारोप करण्यात आला.

सदर रॅलीमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप, बॉम्ब शोधक आणि नाशक पथकाच्या पोलीस निरीक्षक अरूणा सुगावे, पोलीस उपनिरीक्षक स्नेहा पिंपरखेडे, माया भोसले, जयश्री गिरे, अश्विनी गायकवाड, नमिता देशमुख, अंमलदार अशा घोडके व जवळपास ८० ते ९० महिला अंमलदार यांनी सहभाग घेतला होता.